भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र. ५०५/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांकः—१४/०८/२०१६.

१) मोटार सायकलच्या धडकेने, बैलाचा मृत्यु . :—

दिनांक १२/०८/२०१६ चे १७.०० वा. ते १३/०८/२०१६ चे ०४.०० वा.दर. यातील फिर्यादी हा आपली बैल जोडी घेवुन शेता मधुन घराकडे सिंदपुरी येथे परत जात असतांना ईटगाव रोडवर पवनी कडुन ईटगावकडे जाना—या लाल रंगाच्या मोटार सायकल आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील मो.सा. लापरवाहीने, निष्काळजीपने चालवुन फिर्यादीचा १ बैल कि. ३०,०००/—रू. चा यास धडक मारल्याने मरण पावला. व आरोपी याने मो.सा. न थांबविता व कोनतीही मदत न करता, अपघाताची सुचना न देता पळुन गेल्याने फिर्यादी आसाराम पांडुरंग भोयर वय ६२ वर्ष रा. नेहरू चौक सिंदपुरी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम २७९,४२९ भादंवि सहकलम १३४/१८७ (अ)(ब) मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. बिसने पो.स्टे. पवनी हे करीत आहेत.

२) सार्वजनिक ठिकाणी वाहतुकीस व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभे करून मिळून आल्याने गुन्हा नोंद. :—

दिनांक १४/०८/२०१६ रोजी १६.०० वा. दर. यातील आरोपी चालकाने आपले ताब्यातील टाटा सुमो क्र. एमएच ४० ए ०९३० ही आमरोडवर सार्वजनीक ठिकाणी रस्त्यावर येणा—या जाणा—या वाहतुकीस व लोकांच्या जिवीतास धोका पोहचेल अशा स्थितीत उभी करून मिळुन आल्याने पोलीस स्टेशन पवनी येथे कलम २८३ भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. कोडवते पो.स्टे. पवनी हे करीत आहेत.
पवनी हे करीत आहेत.

३) मोटार वाहन कायद्याखाली कारवाई. :—

दिनांक १४/०८/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १६८ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी वाहतुक करणा—यांवर ०२ केस, तिन सिटर वाहनांवरती १४ केसेस व इतर वाहनांवरती १५२ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

(श्री.एस. टी. घुसर )
प्रभारी. पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा.
दुरध्वनी.क्र. ८८०५६११११९

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहिती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती